दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

SHREE VAIBHAVLAXMI ENTERPRISES

URGENTLY REQUIRED

MALE CANDIDATES - FOR PROPERTY REGISTRATION
WORK IN PANVEL AND NAVI MUMBAI

MALE CANDIDATES - OFFICE BOY

MALE/FEMALE CANDIDATE -
FOR XEROX MACHINE OPERATOR WITH BASIC COMPUTER KNOWLEGE

E-MAIL-shreevaibhavlaxmienterprises@gmail.com MOB.NO. 9892848890

ADD. - SHOP NO.02, GROUND FLOOR, BULAND 2,
PLOT NO. 22, SECTOR 5A, NEW PANVEL, RAIGAD 410 206.

वर्ष २० वे | अंक १६२ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शनिवार, दि.३० ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

# आरक्षण द्यायचं, आंदोलन मोडायचं, की मला गोळ्या घालायच्या...; मनोज जरांगे-पाटील यांचा थेट इशारा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आझाद मैदानात उपोषण करणारे मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. आंदोलनासाठी एक-एक दिवसाची मुदतवाढ देण्याऐवजी मराठा समाजाला थेट आरक्षण देऊन टाकावे, असे परखड मत त्यांनी व्यक्त केले. मराठा समाजाला त्रास देऊन, त्यांच्या अन्न-पाण्याची सोय बंद करून मुंबईतून हाकलण्याचा सरकारचा डाव आहे, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

जरांगे म्हणाले, सरकारने मला काल परवानगी दिली, आज पुन्हा एक दिवसाची मुदतवाढ दिली आहे. असले 'भंगार खेळ' खेळण्यापेक्षा सरकारने थेट मराठा समाजाला आरक्षण देऊन खरे राजकारण करावे. गोरगरिबांच्या मुलांना आरक्षण दिले, तर मराठा समाज आयुष्यभर सरकारला विसरणार नाही. मराठा समाजाचे मन जिंकण्याची हीच योग्य वेळ आहे.

आंदोलनादरम्यान आंदोलकांना होणाऱ्या त्रासावरही जरांगे यांनी बोट ठेवले. मराठा समाजाच्या मुलांना लघवी करण्याचीही सोय नाही. वडापाव किंवा इतर खाद्यपदार्थांची दुकाने बंद करण्यात आली आहेत, पाण्याचीही सोय नाही. मराठ्यांनी कंटाळून मुंबई सोडून जावे, असा यामागे डाव आहे, असे ते म्हणाले.



यावर बोलताना त्यांनी सरकारला तुम्ही इंग्रजांपेक्षाही क्रूर झाला आहात अशा शब्दांत फटकारले.

जरांगे यांनी सरकारला थेट इशारा दिला. मराठा समाजाची मुले माज घेऊन आलेली नाहीत, तर वेदना घेऊन आली आहेत. मी उपोषण करून मेलो तरी चालेल, पण या मुलांसाठी दुकाने बंद ठेवू नका. अन्यथा, तुमची आमच्याकडे सभा झाली तर आम्हीही पाणी बंद करू, दुकाने बंद करू, असा इशारा जरांगे यांनी दिला.

'ही लढाई आता आरपारची आहे, आम्ही मागे हटणार नाही. एकतर सरकारला आरक्षण द्यावं लागेल किंवा उपोषण करुन मी तरी मरेन, पण आता मागे हटणार नाही.

आता फक्त आरक्षण नाही, तर त्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय मी आंदोलन मागे घेणार नाही', असं मनोज जरांगे-पाटील म्हणाले.

# लवकरच ठाण्यातून पहिल्यांदाच धावणार मेट्रो

**दै.रायगड नगरी । मुंबई**

वडाळा - ठाणे - कासारवडवली - गायमुख मेट्रो ४ आणि ४ अ मार्गिकेतील कॅडबरी जंक्शन - गायमुख दरम्यानच्या १०.५ किमीचा टप्पा डिसेंबरअखेरीस वाहतूक सेवेत दाखल करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) नियोजन आहे. त्यानुसार सप्टेंबरमध्ये कॅडबरी जंक्शन - गायमूख टप्प्यातील मेट्रो गाड्यांच्या चाचणीला सुरुवात करण्यात येणार आहे.

यासाठी वेगात तयारी सुरू असून आता शनिवारी (३० ऑगस्ट) १०.५ किमी मार्गिकेतील डोंगरीपाडा मेट्रो स्थानक - गायमुख मेट्रो स्थानकांदरम्यानच्या ४.६३८ किमीच्या मार्गिकेवरील विद्युत प्रवाह कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, ओव्हरहेड लाईनच्या जवळ जाऊ नये यासंबंधीची सार्वजनिक अधिसूचना एमएमआरडीएकडून जारी करण्यात आली आहे. चाचणी सुरू झाल्यास ठाण्यातून पहिल्यांदाच मेट्रो धावताना दिसणार आहे.

एमएमआरडीएने वडाळा - कासारवडवली दरम्यानच्या ३२.३२ किमी लांबीच्या आणि कासारवडवली - गायमुख दरम्यानच्या २.७ किमी लांबीच्या मेट्रो ४, ४ अ मार्गिकांचे काम हाती घेतले आहे. या मार्गिकेतील कॅडबरी जंक्शन - गायमुखदरम्यानच्या १०.५ किमी लांबीचा टप्पा डिसेंबरअखेरीस वाहतूक सेवेत दाखल करून ठाणेकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न पूर्ण केले जाणार आहे. हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्यासाठी स्थानकांच्या आणि इतर कामांना एमएमआरडीएने वेग दिला आहे. दुसरीकडे मेट्रो मार्गिकेच्या संचलनासाठीच्या अत्यंत महत्त्वाचा आणि पहिला टप्पा सप्टेंबरमध्ये सुरू करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. या महत्त्वाच्या टप्प्यात मेट्रो गाड्यांची चाचणी करण्यात येणार आहे. मेट्रो गाड्यांच्या चाचण्यांना सुरुवात करण्यासाठी एमएमआरडीएने आनंद नगर जंक्शन येथे मेट्रो गाड्यांचे सहा डबे नुकतेच यशस्वीरित्या उन्नत रुळांवर चढविले आहेत. हे डबे कासारवडवली स्थानकांपर्यंत नेण्यात आले आहेत. आता या डब्यांची जोडणी करून गाडी चाचणीसाठी सज्ज केली जाणार आहे. ही चाचणी सप्टेंबरमध्ये सुरू करण्याच्यादृष्टीने एमएमआरडीएने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कॅडबरी जंक्शन - गायमूख या टप्प्यातील डोंगरीपाडा मेट्रो स्थानक - गायमूख मेट्रो स्थानक टप्प्यातील विद्युत प्रवाह शनिवारी कार्यान्वित करण्यात येणार आहे.



१४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती असलेल्या लाडक्या गणरायाचे बुधवारी सर्वत्र उत्साहात आगमन झाले. दरवर्षीप्रमाणे यंदाही माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथील निवासस्थानी लाडका बाप्पा विराजमान झाला आहे. शाम घरत आणि चंद्रभागा घरत यांच्या हस्ते गणपती बाप्पाची पूजा आणि प्राण प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, भरत ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, विशाल ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर,भारत ठाकूर, भूषण ठाकूर, स्वप्निल ठाकूर, प्रतीक ठाकूर, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबीय उपस्थित होते.

# कंटेनर मधील लाखो रुपये किमतीच्या मालाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका ट्रेलर वर असलेल्या कंटेनर चे अज्ञात चोरटयांनी कोणत्यातरी हत्यारांनी सील व लॉक तोडून कंटेनर मधील लाखो रुपये किमतीचा माल चोरून नेल्याची घटना पनवेल जवळील जेएनपीटी ते पळस्पे महामार्गालगत असलेल्या मामाचा ढाबा, भंगारपाडा येथे घडली आहे .

अरविंद सिंग यांच्या मालकीच्या ट्रेलर क्रमांक एमएच ४३ सीई - ०२३३ या ट्रेलर वर असलेल्या कंटेनर चे अज्ञात चोरटयांनी कोणत्यातरी हत्यारांनी सील व लॉक तोडून कंटेनर मधील लाखो रुपये किमतीचा माल चोरून नेल्याची घटना पनवेल जवळील जेएनपीटी ते पळस्पे महामार्गालगत असलेल्या मामाचा ढाबा, भंगारपाडा येथे घडली आहे.

याबाबत याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### महेंद्रशेठ घरत यांच्या 'सुखकर्ता' वर बाप्पाचे आगमन!

# गणरायाने मला भरभरून दिले : महेंद्रशेठ घरत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशभरात विशेषतः महाराष्ट्रात गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर गणरायाचे आगमन भाविकांनी बुधवारी (ता. २७) जल्लोषात केले. तसेच गणरायाचे आगमन आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या 'सुखकर्ता' बंगल्यावर झाले. सुंदर रांगोळ्या, विविध प्रकारच्या फुलांची देखणी आरास आणि वाद्यांच्या गजरात गणरायाचे स्वागत महेंद्रशेठ घरत आणि शुभांगीताई घरत यांनी 'सुखकर्ता'वर केले. यावेळी बुधवारी सकाळी अकरा वाजता गणरायाला अभिषेक करण्यात आला. त्यानंतर घरत परिवारातील कुटुंबीयांनी एकत्र येऊन सवाद्य आरती केली.


यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, ऋऋबाप्पाने मला भरभरून दिले आहे. त्याच्या ऋणातच मी आहे. गणेशाच्या आशीर्वादानेच मी नुकतीच दुसऱ्यांदा महाकठीण आणि हिंदू धर्मात पवित्र समजली जाणारी कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण केली. त्यामुळे मी स्वतःला भाग्यवान समजतोय. 'सुखकर्ता' बंगल्यावर आलेला कुणीही रिकाम्या हाताने परत जाणार नाही, जे जे गरजवंत आहेत त्यांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी गणराया मला साथ दे, अशीच गणरायाचरणी माझी विनम्र प्रार्थना!''

यावेळी सोनाली आणि मयुरेश चौधरी, कुणाल घरत, सेजल घरत आणि घरत परिवारातील सर्व कुटुंबीय उपस्थित होते. महेंद्रशेठ घरत यांच्या घरी बाप्पा २ सप्टेंबरपर्यंत आहे. गणेभक्त तोपर्यंत दर्शन घेऊ शकतात.

दरम्यान, गणरायाच्या शुभमुहूर्तावर महेंद्रशेठ घरत यांनी आपले जुणेजाणते आणि परिस्थितीत उत्तम साथ देणारे सहकारी बाळकृष्ण म्हात्रे (ओवळे गाव) यांना नवीकोरी स्कूटर भेट म्हणून दिली. तिचे पूजन महेंद्रशेठ घरत यांच्या 'सुखकर्ता'वर झाले.

### पनवेल महानगरपालिकेच्या अभय योजनेंतर्गत १५ सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९० टक्के सुट

# मालमत्ताधारकांना अभय योजनेचा लाभ घ्यावा : मंगेश चितळे







**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या मागणीनुसार आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या योजनेत शास्ती माफीसाठी दिलेली मुदत वाढविण्यात आली आहे. दिनांक १५ सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९० टक्के सुट राहणार आहे. मालमत्ताधारकांना अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरल्यास यावर्षीच्या मालमत्ता करावर ५ टक्के सूट मिळणार आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

महापालिकेच्यावतीने करदात्यांना ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यासाठी प्रोत्साहित केले जात असून, असे केल्यास अतिरिक्त २ टक्के सवलतीचा लाभ मिळू शकतो. तसेच ऊर्जा बचत, जल पुनर्भरण, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक उपक्रम यामध्ये सहभाग घेणाऱ्या करदात्यांना देखील २ टक्के सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या panvelmc.org या अधिकृत संकेतस्थळावर तसेच PMC Tax App आणि Panvel Connect App द्वारे ऑनलाइन कर भरता येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊन प्रलंबित कर तत्काळ भरावा, असे आवाहन आयुक्त उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

## पनवेल महापालिकेची मालमत्ता कर वसुलीत उल्लेखनीय कामगिरी

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत यावर्षी कर वसुलीत उल्लेखनीय यश मिळाले आहे. १ एप्रिल २०२५ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण १ लाख ३६हजार ९६७ मालमत्ता धारकांनी आपला मालमत्ता कर भरला असून त्यातून तब्बल ४८३.०८ कोटींची वसुली करण्यात आली आहे. दरम्यान, १८ जुलै २०२५ ते ३० ऑगस्ट २०२५ या कालावधीत सुरू असलेल्या 'अभय योजने'अंतर्गत ७८ हजार ४५ करदात्यांनी मालमत्ता कर भरून २५२.४४ कोटींचे उत्पन्न महापालिकेला मिळाले आहे. मागील आर्थिक वर्षातील एकूण मालमत्ता कर वसुली ही ४२४ .७८ कोटी झाली होती. त्या तुलनेत यावर्षी ऑगस्ट महिन्यातच ४८३.०८ कोटींची विक्रमी वसुली करण्यात आली आहे.महापालिकेच्या या उच्चांकी वसुलीमुळे पनवेल महानगरपालिकेच्या विकासकामांना आर्थिक गती मिळणार आहे. नागरिकांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## कर-मित्र' चॅटबॉटचे लोकार्पण

नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'कर-मित्र' चॅटबॉटचे नुकतेच लोकार्पण केले आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवेल.

# कर्णावतीचा क्रीडाकुंभ

उेाप थशरश्रींह ऋाशी : भारत सन २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे यजमानपद मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. केंद्र सरकारने या स्पर्धेसाठी बोली लावण्यास मान्यता दिली आहे. कॅनडाने माघार घेतल्याने भारताची दावेदारी मजबूत झाली आहे. गुजरातमध्ये या स्पर्धेची तयारी सुरू असून, पायाभूत सुविधांवर भर दिला जात आहे. या स्पर्धेमुळे देशाच्या क्रीडा संस्कृतीला चालना मिळेल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा उंचावेल, असे तज्ज्ञांचे मत आहे. सन २०३० मधील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी भारताच्या वतीने यजमानपदाची बोली लावण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याने या स्पर्धेच्या आयोजनाच्या दिशेने एक पाऊल पुढे पडले आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओसी) काही काळापूर्वीच भारताच्या यजमानपदाची तयारी सुरू केली होती. आयोजनाच्या स्पर्धेतील एक दावेदार असलेल्या कॅनडाने आर्थिक अडचणींमुळे या स्पर्धेच्या यजमानपदाच्या शर्यतीतून माघार घेतल्यामुळे भारताच्या दाव्याला अधिक बळ मिळाले. 'आयओसी'च्या प्रस्तावामध्ये दिल्ली आणि भुवनेश्वरचाही विचार झाला होता. मात्र, बराच काळ शांत राहून प्रत्यक्ष यजमानपदाचा दावा करण्याची मुदत समाप्त होण्यापूर्वी ४८ तास केंद्राकडून या प्रस्तावाला घाईघाईने मान्यता मिळणे, याचा अर्थ अन्य दोन्ही शहरांचा विचार तोंडी लावण्यापुरताच झाला असावा, या शंकेला वाव मिळतो. सध्या नायजेरिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यासह आणखी दोन देश या स्पर्धेच्या आयोजनासाठी इच्छुक असल्याचे सांगितले जाते. मात्र, भारतातील क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधा आणि राष्ट्रकुल स्पर्धेतील उंचावलेल्या कामगिरीसह गेल्या काही काळात आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर निर्माण झालेला दबदबा, या पार्श्वभूमीवर यजमानपदाची माळ भारताच्या गळ्यात पडण्याची शक्यता आहे. या शहराच्या निवडीबाबत काही वाद आणि 'सगळ्याच गोष्टी गुजरातलाच कशा,' अशी शंका उपस्थित होणे साहजिक असले, तरी गेल्या काही वर्षांमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय 'इव्हेंट'च्या आयोजनामध्ये गुजरातने नियोजनबद्ध पावले टाकली आहेत. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेचे यजमानपद, हा सन २०३६ मधील ऑलिम्पिकच्या आयोजनाची रंगीत तालीम म्हणावी लागेल. सन २०२२ मधील राष्ट्रीय क्रीडास्पर्धा आणि नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना यामुळे गुजरातच्या आयोजनक्षमतेवर शिक्कामोर्तब झाले आहे; तसेच स न २०३६च्या ऑलिम्पिकचे लक्ष्य समोर ठेवून सरदार वल्लभभाई पटेल क्रीडासंकुलासह फुटबॉलची मैदाने आणि जलतरण तलाव अशा पायाभूत सुविधांची उभारणी तेथे सुरू आहे. शिवाय, मोदी आणि शहा यांच्या गृहराज्यातील या उपक्रमास केंद्र सरकारचा भरभक्कम पाठिंबा मिळणार, हे ओघाने आलेच. गेल्या काही काळात क्रिकेटच नव्हे; तर मैदानी खेळांमध्येही भारताचे स्थान दिवसेंदिवस उंचावत आहे. भारतीय खेळाडूंच्या जागतिक स्पर्धांमधील चमकदार कामगिरीमुळे नवी पिढी या खेळांकडे आकर्षित झाली असून, महानगरांबरोबरच लहान शहरे आणि ग्रामीण भागातील गुणवत्तेला वाव मिळत आहे. नुकत्याच मंजूर झालेल्या राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकामुळे देशातील क्रीडासंघटनांच्या कामकाजात सुसूत्रता आणि पारदर्शकता येणे अपेक्षित आहे. क्रीडाविषयक प्रशासनात सुधारणा झाल्यास पायाभूत सुविधांचे नियोजन आणि उभारणीस अधिक गती मिळू शकते; तसेच 'डोपिंग'विषयक कडक कायद्यांमुळे भारताची प्रतिमाही सुधारू शकते. पाकिस्तानशी द्विपक्षीय सामन्यांवरील बंदी कायम ठेवून आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळण्याच्या निर्णयावरून वाद झाले खरे; मात्र भविष्यातील घडामोडी आणि अशा स्पर्धांच्या आयोजनाच्या संभाव्य संधी पाहता, खुल्या विचारांचा देश ही भारताची प्रतिमा उभी करण्याच्या दिशेने सरकारची पावले दिसतात.या सर्व पार्श्वभूमीवर देशात क्रीडासंस्कृतीला चालना देण्याच्या दृष्टीने अधिकाधिक आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन महत्त्वाचे आहे. या स्पर्धांमुळे क्रीडा संस्कृतीच नव्हे; तर पायाभूत सुविधा आणि आर्थिक व्यवहार, पर्यटन आणि रोजगारालाही मोठी चालना मिळते आणि संबंधित शहरांचे जगभरात 'ब्रँडिंग' होते. त्याबरोबरच राष्ट्रकुल गटातील ७२ देशांमधील या क्रीडा स्पर्धेमध्ये भारतीय खेळाडूंना अव्वल कामगिरीस मोठी संधी आहे. या निमित्ताने १५ वर्षांपूर्वीच्या राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेची आठवण होणे साहजिक आहे. दिल्लीतील पूल कोसळण्यापासून ते आयोजनात झालेल्या घोटाळ्यांमुळेच या स्पर्धा गाजल्या. तत्कालीन आयोजक सुरेश कलमाडी यांना या प्रकरणात तुरुंगवास घडला. तेव्हाच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या बदनामीत या घोटाळ्याचा मोठा वाटा होता. आता कलमाडी यांना या प्रकरणात क्लीन चिट मिळाली आहे. वेगवेगळ्या आघाड्यांवर देशाचेही स्थान उंचावले आहे. यंदा यजमानपदाची संधी मिळाल्यास हॉकी, क्रिकेट, बॅडमिंटन, कुस्ती व अन्य देशी खेळांच्या समावेशासाठी पावले उचलता येतील. भारतीय चित्रपटसृष्टी आणि क्रिकेटसह अन्य खेळांमधील स्थान, ही भारताची 'सॉफ्ट पॉवर' असल्याने अशा अधिकाधिक स्पर्धा देशाचे स्थान उंचावण्यासाठी फायदेशीरच आहेत. मात्र, पूर्वीच्या चुकांची पुनरावृत्ती टाळून नेटकेपणाने आणि पारदर्शकपणे त्यांचे आयोजन व्हायला हवे.

# गणेशोत्सवात बाप्पासोबत 'सुरक्षेचा संदेश' – २०० मंडपांतून बालसुरक्षा जनजागृती



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त विविध गणेशोत्सव मंडपांमध्ये अर्पण संस्थेतर्फे आयोजित वैयक्तिक सुरक्षा जनजागृती मोहिमेत सहभागी होताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. पालक आणि मुलांना वैयक्तिक सुरक्षेच्या मूलभूत नियमांविषयी जागरूक केल्यास आपण बाल लैंगिक शोषणाला आळा घालू शकतो. समाजापर्यंत हा संदेश पोहोचवणे आवश्यक आहे. कायद्याचे रक्षणकर्ते म्हणून आम्ही त्यांच्या या उपक्रमाच्या पाठीशी आहोत.असे रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीमती आंचल दलाल याप्रसंगी बोलताना म्हणाल्या

बाल लैंगिक शोषणाला आळा घालण्यासाठी आणि अशा घटनांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी कार्यरत असलेल्या अर्पण संस्थेने रायगड पोलीस विभाग आणि महिला व बालविकास विभाग, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने, एक अभिनव जनजागृती मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेअंतर्गत, २०० पेक्षा अधिक सार्वजनिक गणोशोत्सव मंडपांमध्ये आणि गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मुख्य मार्गांवर, बाल लैंगिक शोषण प्रतिबंधावर जनजागृती करणारे फलक लावले जाणार आहेत. मुलांना बाल लैंगिक शोषणाविषयी आवश्यक ती माहिती आणि कौशल्ये प्रदान करून त्यांना स्वतःचे रक्षण करण्यासाठी सक्षम बनवणे आणि त्यांच्यासोबत आलेल्या प्रौढ व्यक्तींना बाल लैंगिक शोषणाविषयी जागरूक बनवून, त्यांना आपल्या मुलांचे रक्षण करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.

बाल लैंगिक शोषण हा एक अत्यंत गंभीर अपराध असून, आपल्या देशात दर दिवशी १८७ मुलांचे लैंगिक शोषण केले जाते. विशेष म्हणजे ९७% घटनांमध्ये, मुलांचे लैंगिक शोषण हे त्यांच्या ओळखीच्या व्यक्तींकडून केले जाते. त्यामुळे या जनजागृती मोहिमेद्वारे शोषणाच्या प्रतिबंधावर विशेष भर दिला जाणार असून, मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाचा (झडए) व्यापक प्रचार केला जाणार आहे. वैयक्तिक सुरक्षा शिक्षण मुलांना असुरक्षित घटना आणि व्यक्ती ओळखून त्यांना नकार देण्यासाठी आणि अशा परिस्थितींमध्ये मदत मागण्यासाठी सक्षम बनवते.

# तळा पोलीस ठाण्यात श्रीगणपती बाप्पा विराजमान

**दै.रायगड नगरी । तळा**



पोलीस ठाण्यात दिनांक २७ ऑगस्ट२५ रोजी सकाळी गणपती बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना पोलीसशिपाई प्रशांत दहीफळे यांच्या हस्ते विधीवत करण्यात आली.श्री गणरायाच्या आगमनाची तयारी पोलीस निरीक्षक सतीश गवई पोलीस अधिकारी अंमलदार यांनी जोरदार तयारी केली आहे गणपती बाप्पाचे सकाळी पोलीस ठाण्यात आगमन होऊन त्याची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली पोलीस अधिकारी अमंलदार पोलीस कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने गणपती बाप्पाचे स्वागत केले अकरा दिवस गणपती विराजमान होणार आहे.

पोलीस हे सदैव चौवीस तास कामांमध्ये असल्यामुळे त्यांना सुट्टी मिळत नाही आणि गौरी गणपती सण धार्मिक असल्यामुळे प्रत्येकाला गावालापोहोचणेशक्य नसते त्यामुळे गेले दहा वर्षापासून तळा पोलीस ठाण्यात गणपती विराजमान होतआहेत्यामुळेआपल्या सणाचा आनंद लुटता येतो ही संकल्पना दहा वर्षा पासून सुरू असून यामुळे अनेक कर्मचारी महिला कर्मचारी यांना देखील लाभ घेता येतो.श्रीचेदर्शनासाठी येणाऱ्यामान्यवर, प्रतिष्ठित व्यक्ती चा यशोचीत सन्मान केला जातो.व दररोज पुजा सेवा सकाळ संध्याकाळी आरतीचा लाभ प्रतिष्ठित व्यक्ती, जेष्ठ मान्यवर, पत्रकार सर्व पक्षीय पदाधीकारी यांना देऊन समाजात आदर्श ठेवला आहे. दरम्यान रवीभाऊ मुंढे नगरसेवक रितेश मुंढे,यांनी दर्शन घेतले.

काल मा.ना.कु.अदितीताई वरदा सुनील तटकरे, मंत्री, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य यांनी आज तळा पोलीस ठाण्याच्या श्रीगणेशाचे दर्शन घेतले.

समवेत नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, तालुका अध्यक्ष नाना भौड,ड.उत्तम जाधव उपस्थित होते.सर्व नागरिकांनी बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी यावे असे आवाहन तळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतीश गवई यांनी केले आहे .



**टाटा पॉवरच्या खोपोली व भिरा जलविद्युत केंद्रात यंदा गणेशोत्सव भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. खोपोली व भिरा या दोन्ही शतायुषी परंपरा असलेल्या केंद्रांनी अनोख्या थीम्सद्वारे श्रद्धा आणि वारसा उजागर केला. खोपोली जलविद्युत केंद्रात केदारनाथ थीमवर सजवलेले देखावे विशेष आकर्षण ठरले. या माध्यमातून श्रद्धा आणि जलविद्युत वारशाच्या शंभर वर्षांहून अधिक परंपरेला उजाळा देण्यात आला.तर भिरा जलविद्युत केंद्रात गडाच्या थीमवर सजवलेला देखावा साकारण्यात आला होता. ऐतिहासिक वारशाला उजाळा देणारा हा उपक्रम भाविकांना आकर्षित करणारा ठरला. धार्मिक भावनेची ताकद आणि ऐतिहासिक प्रेरणेची जाणीव या दोन्हींचा संगम साधत, टाटा पॉवरच्या केंद्रातील गणेशोत्सवाने श्रद्धा, संस्कृती आणि वारशाची उज्ज्वल परंपरा पुढे चालवली.**

## झोपेमध्ये ब्रिजच्या पिल्लरच्या कठड्यावरून पडून अज्ञात इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये झोपेत ब्रिजच्या पिल्लरच्या कठड्यावरून पडुन एक इसम जखमी झालेल्या अवस्थेत पनवेल शहर पोलिसांना मिळून आल्याने त्यास ॲम्बुलन्सने उपजिल्हा रूग्णालय, पनवेल येथे नेले असता, तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून मयत झाल्याचे घोषीत केले असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. अनोळखी बेवारस इसम वय अंदाजे वय ३५ ते ४० वर्ष, रंग गोरा, उंची अंदाजे ५ फुट ५ इंच, चेहरा उमट अंगाने मध्यम, डोक्याचे केस काळे, दाढी मिशीचे केस काळे वाढलेले, अंगात नेसुन फुलाची बारीक डिझाईन असलेला हाफ बाहयाचा शर्ट व काळसर रंगाची फुल पॅन्ट अशा वर्णनाचा आहे. या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस किंवा पोलीस उपनिरीक्षक राहुल डोळस यांच्याशी संपर्क साधावा.



**पेण प्रेस क्लबचे अध्यक्ष, पत्रकार देवा पेरवी यांच्या जोहे पेण येथील घरी विराजमान झालेला बाप्पा**

# गौरीपुजनासाठी बाजारात सुपांना मोठी मागणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

गणराया पाठोपाठ येणाऱ्या गौरीला ओवसा देण्यासाठी पारंपारीक सुपांना मागणी वाढलेली दिसत आहे. बांबूपासून बनवलेले सुप भाऊ गौरी-गणपतीत बहिणीसाठी नेतो आणि बहिण त्याचा पाहूणचार करते. तर काही ठिकाणी नवीन नवरीला पाच सुपांचा ओवसा देण्याची पारपांरिक पध्दत रूढ आहे. सुपात फळे, वेगवेगळया फुलांनी व दुर्वा, तुळस, आघाडा, पुरणपोळ्या, करंजी, आदी साहित्याचा ओवसा गौरीला दिला जातो. यावेळी भाऊ बहिणीला साडीचोळी, बांगडीसाठी पैसे देतो. साजशृंगार, सौभाग्याचे लेण परिधान करून महिला नवऱ्याच्या उदंड आयुष्याची पार्थना करून गौरीची ओटी भरतात. येत्या रविवारी (दि. ३१) गौरीचे आगमन तसेच सोमवारी (दि.१) सप्टेंबर रोजी गौरीपुजन असल्याने बाजारात सुपांना मोठी मागणी दिसून येत आहे.

गौरी पुजनाच्या निमित्ताने बाजारात बांबूच्या सुपाची मागणी वाढलेली दिसत आहे. बुरूड समाजाच्या वतीने गणपती उत्सवातील गौरीपुजनासाठी सूप बनविले जातात. गणेश उत्सवापूर्वी बुरूड समाजाच्यावतीने सुप बनविण्याचा प्रक्रियेस सुरूवात केली जाते. बाजारात सध्या १५० ते २०० रूपयांला एक सूप असा दर सुरू आहे. मात्र, बांबूंच्या वाढत्या दरासह वाढलेली मजुरांची मजूरी यामुळे सूप बनविण्यासाठी बुरूड समाजाला खूपच ओढाताण करावी लागत आहे.

सध्या येथील पंचक्रोशीत सातारा जिल्ह्यातील सूप बनविणारे कारागीर आलेले दिसून येतात. येथील शेतकरी व बागायतदारांकडून बांबू खरेदी करून सूप बनविण्याची कला उपयुक्तपणे साकारतात. स्थानिक बाजारपेठेत या कारागिरांनी ठिकठिकाणी बस्तान ठोकेलेले दिसते. परिणाम स्थानिक बुरूड समाजाच्या सूप बनविण्याचा व्यवसायाला स्पर्धक तयार झालेले दिसून येतात. मात्र, किमतीत कोणताही फरक नसून सुपाचा बाजारभाव एकच असल्याचे निदर्शनास येत आहे.

# ज्येष्ठ अभिनेत्याने घेतले सपत्नीक पनवेलच्या महागणपतीचे दर्शन!

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिनेसृष्टीत खलनायकाच्या प्रभावी भूमिका साकारत प्रेक्षकांच्या मनावर वेगळी छाप पाडणारे ज्येष्ठ अभिनेते दीपक शिर्के आणि त्यांच्या सौभाग्यवती, कोकण कृषी विद्यापीठाच्या प्राचार्य डॉ. गार्गी शिर्के यांनी सालाबादप्रमाणे यंदाही पनवेलच्या महागणपतीचे दर्शन घेतले. गणेशोत्सवाच्या दरबारात या दाम्पत्याच्या उपस्थितीने केवळ सिनेप्रेमींनाच नव्हे तर पनवेलकरांनाही एक खास आनंदाचा क्षण दिला. शिर्के दाम्पत्याच्या आगमनावेळी कांतीलाल प्रतिष्ठानचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनी त्यांचे स्वागत केले.

दर्शनानंतर अचानक एक वेगळाच माहोल रंगला. शिर्के आणि कडू यांच्यातील संवाद हा फक्त शिष्टाचारापुरता न राहता मनमोकळ्या गप्पांच्या फडात बदलला. नाट्य, सिने, सांस्कृतिक क्षेत्रापासून ते पनवेलच्या महागणपतीच्या स्थापनेपासूनचा प्रवास हा विषय गप्पांच्या धाग्यात गुंफला गेला. गप्पांचा विस्तार पुढे राज्य व केंद्रातील राजकारणापर्यंत पोहोचला.

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, भाजपा दिवगंत नेते प्रमोद महाजन, लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्यापासून ते राज्याचे माजी व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिवसेनापक्षप्रमुख उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे यांची कार्यशैली, राजकीय दृष्टी आणि लोकांशी जोडणारा त्यांचा स्वभाव या सर्व बाबींवर गप्पांचा फड रसाळ झाला.

दीपक शिर्के हे सिनेसृष्टीत मुख्यत्वे खलनायकाच्या भूमिकेसाठी ओळखले जातात. मराठी, हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. त्यांच्या विनोदी भूमिकांसह खलनायकांचीही भूमिका प्रेक्षकांच्या मनात आजही घर करून आहेत.

पनवेलच्या महागणपतीच्या दर्शनावेळी त्यांनी अभिनयासोबतच समाजाविषयीची आपली आस्था देखील मनमोकळेपणाने व्यक्त केली. 'सिनेमा हा केवळ मनोरंजनाचा नव्हे तर समाजाला विचार करायला लावणारा माध्यम आहे', असे मत त्यांनी गप्पांच्या ओघात मांडले.



# अर्जुनी हिने पनवेलमधील विविध गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन गणरायाचे घेतले दर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अल्पावधीतच राज्यभरात लोकप्रिय ठरलेली नाट्य आणि सिने बालकलाकार अर्जुनी हिने पनवेलमधील विविध गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन गणरायाचे दर्शन घेतले .

सर्वप्रथम मा. नगरसेवक तथा भाजपा जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या घरच्या गणपतीचे दर्शन घेऊन बाप्पाचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर अभिनव युवक मित्र मंडळ आयोजित 'पायोनियरचा राजा' चे दर्शन घेतले.

या ठिकाणी केलेल्या सुबक व आकर्षक सजावटीचे अर्जुनीने मनापासून कौतुक केले.या प्रसंगी मंडळाचे जेष्ठ सदस्य पत्रकार संजय कदम, कास्टिंग डायरेक्टर व भाजपा सोशल मीडिया संयोजक प्रसाद हनुमंते, मा. नगरसेवक समीर ठाकूर, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे तसेच भूषण पोवळे उपस्थित होते.

यावेळी जे. जी. पाटील सर आणि पाटील कुटुंबीयांनी अर्जुनीला पुढील कारकिर्दीसाठी आशिर्वाद दिले.यानंतर अर्जुनीने मानघर येथील श्री स्वामी समर्थ मठात जाऊन दर्शनाचा लाभ घेतला. या ठिकाणी मठाधिपती किशोर पाटील सर विशेषतः उपस्थित होते. त्याचप्रमाणे मा. नगरसेवक डी. आर . भोईर यांच्या सुद्धा गणपतीचे तिने दर्शन घेतले .

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# गणेशोत्सव : टिळकांच्या प्रेरणेपासून 'राज्य महोत्सव'पर्यंतचा प्रवास

भारतीय संस्कृतीतील सर्वाधिक लोकप्रिय उत्सवांपैकी एक म्हणजे गणेशोत्सव. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात हा उत्सव जल्लोषात, भक्तिभावात आणि सामूहिकतेच्या भावनेत साजरा होतो. हा सण सर्व समाजात आणि घराघरात लोकप्रिय आहे. या उत्सवाचा इतिहास केवळ धार्मिकतेशी जोडलेला नसून, त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक आयामही गुंफलेले आहेत. लोकमान्य टिळकांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती व जनतेला संघटित करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू केली.या माध्यमातून सामाजिक एकोपा संघटनात्मक चळवळी तसेच कला व सांस्कृतिक उपक्रम सुरु करण्याचे त्यांचे धोरण होते. महाराष्ट्र शासनाने आता एक पाऊल पुढे टाकत या गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव राज्य वैभवी बाण्यामध्ये महाराष्ट्रात सर्वत्र सुरु आहे.

**टिळकांचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय**

सन १८९३ साली लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्या काळात ब्रिटिश सत्तेखाली भारतीय समाज उभारी घेऊ शकत नव्हता. सामूहिक संघटनेला दडपशाही होती. परंतु टिळकांनी गणेश उत्सव हा घराघरातील कौटुंबिक वातावरणातून बाहेर आणला आणि त्याला सार्वजनिक व्यासपीठ दिले. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता तर सामाजिक एकात्मता आणि राजकीय जागृती घडवून आणणारा होता. मंदिरात किंवा घरात मर्यादित राहिलेला आनंद लोकांच्या,समूहांच्या विविध जाती-पंथांच्या मान्यतेला उतरला. उत्सवाचे सार्वत्रिकरण झाले.पुढे हळूहळू समाजाला एकत्र आणणारा हा उपक्रम बनला.

**गणेशोत्सवाचे प्रदेशनिहाय स्वरूप**

महाराष्ट्रातील विविध भागांत गणेशोत्सव वेगवेगळ्या पद्धतींनी साजरा केला जातो. कोकणात हा उत्सव संस्कृतीला उजाळा देणारा असतो. गावी जाऊन कुटुंबासोबत उत्सव साजरा करणे ही कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. नारळी पोर्णिमा ते विसर्जनापर्यंत निसर्ग, समुद्रकिनारे आणि पारंपरिक घरगुती पूजा यामध्ये एक विलक्षण उत्साह व एकोप्याचे वातावरण अनुभवता येते. या भागातील मूळ कला संस्कृतीची जोपासना व सादरीकरण या काळामध्ये केली जाते. विदर्भ, मराठवाड्यात नाटक, कला, संस्कृती, कवी संमेलन आणि विविध गुण प्रदर्शनाचे आयोजन करणारा महोत्सव म्हणजे गणेश महोत्सव नागपूर, अमरावती, चंद्रपूर यांसारख्या शहरांमध्ये गणेशोत्सवाला विसर्जन मिरवणुकीला अनेक वर्षाची परंपरा आहे. विदर्भातील अनेक नामवंत व्याख्यानमाला या काळामध्ये आयोजित केल्या जातात.सांस्कृतिक कार्यक्रमांची सर्वाधिक रेलचेल या काळात असते.

पुण्यातील अनेक ऐतिहासिक गणपती मंडळांना शंभर वर्षांहून अधिक परंपरा आहे. अनेक मानाची मंडळे आजही परंपरेचे जतन करतात. सांस्कृतिक स्पर्धा, नाटकं, कीर्तनं आणि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम हे वैशिष्ट्य येथे जपले जाते.देश विदेशातील कलाकारांना स्थान देणारे अनेक फेस्टिवल, उत्सव,कार्यक्रम या काळात पुण्यामध्ये साजरे होतात.पुण्यातला गणेशोत्सव बघायला देशभरातून नागरिक या काळात पुण्यामध्ये येत असतात.

मुंबई म्हणजे गणेशोत्सवाचा महासागर, गिरगावातून सुरु झालेला हा सार्वजनिक उपक्रम या महानगराची ओळख झाला आहे. चाकरमान्यांची सुट्टी, बाजारपेठेत वाढलेली उलाढाल आणि कला-उद्योगाला मिळणारी चालना यामुळे मुंबईतील गणेशोत्सवाला खास आर्थिक महत्त्व आहे. महाराष्ट्रातील सिने, नाट्य कलावंतांचे शहर असणाऱ्या मुंबईमध्ये कला जगताने देखील गणेश उत्सवाला चालना दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी देखील या काळात बाप्पा विराजमान असतात. प्रत्येक सोसायटीत होणारा गणेशोत्सव, सार्वजनिक सहभागाचे आदर्श उदाहरण ठरते. शिवाय सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभराच्या खाद्य संस्कृतीलाही चालना मिळते.

**उत्सवाचे स्वरूप : धार्मिकतेपासून वार्षिक आनंदोत्सवापर्यंत**

गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पूजा किंवा कर्मकांडामध्ये कोणतीही अनिवार्यता नाही. कोणत्याही जाती, धर्मातील व्यक्ती या उत्सवात सहभागी होऊ शकतात. म्हणूनच हा उत्सव एका धार्मिक मर्यादेपलीकडे जाऊन सामूहिक वार्षिक आनंदोत्सवाचे स्वरूप धारण करतो. दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस, दहा दिवस अशा विविध कालावधीत हा उत्सव आपआपल्या पध्दतीने साजरा केला जातो. शेकडो बाल गणेश मंडळे, सार्वजनिक कार्यक्रमांच्या बिजारोपणासाठी प्रेरणास्त्रोत होऊन जातात. मुलांमध्ये संघटन शक्ती, कला, कौशल्य, नेतृत्व. विकासासाठी हा महोत्सव पुढे येतो. महाराष्ट्रामध्ये घडलेल्या शेकडो कलाकारांना गणेश महोत्सवाच्या व्यासपीठानेच पहिली संधी दिली आहे. हा जागर आताही कायम आहे.

**कला, नेतृत्व व समाजप्रबोधनाचे व्यासपीठ**

गेल्या शंभर वर्षांत गणेशोत्सवाने हजारो कलाकार, कवी, नकलाकार, दिग्दर्शक, नेपथ्यकार, शिल्पकार यांना व्यासपीठ दिले. सामाजिक समस्यांवर देखावे, शैक्षणिक संदेश, पर्यावरणपूरक मूर्ती यांमुळे या उत्सवात जागरूकता आणि प्रबोधन घडते. गणेशोत्सव हे नेतृत्व विकसित करणारी शाळाच म्हणावी लागेल. स्वयंसेवकांचे संघटन, व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन या सर्व गोष्टी किशोरवयातील शाळकरी मुलांना,तरुणांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देतात.

**महाराष्ट्र शासनाचा निर्णय : राज्य उत्सवाचा दर्जा**

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने २०२५ पासून गणेशोत्सवाला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी विधिमंडळात १८ जुलैला या संदर्भातील घोषणा केली आहे. हा निर्णय घेताना राज्य शासनाने सांस्कृतिक कार्य संचालनालय,पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव,तसेच प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनाही कार्य विभागून दिले आहेत. राज्य शासनाने आपल्या शासन निर्णयात राज्य महोत्सवामध्ये अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाज घटकांना सामाजिक सलोख्यांसाठी एकत्रित आणणे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील गणेशोत्सवाला प्रोत्साहन देणे, विविध सांस्कृतिक विषयाचे जतन व संवर्धन करण्याला प्राधान्य दिले आहे. राज्य महोत्सव अंतर्गत उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करण्याचे नियोजनही राज्य शासनाने केले आहे.राज्यस्तरीय सोहळा आयोजित करण्याची जबाबदारी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीला दिली आहे.विविध स्पर्धांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

**पर्यावरणपूरकतेला प्राधान्य :**

राज्य महोत्सवामुळे गणेशोत्सवातील विधायकतेला महत्त्व आले आहे.राज्य शासनाने या उत्सवात आपला सहभाग अधिक सक्रिय केल्यामुळे आता ध्वनी, वायू, जल प्रदूषण विरहित परिसर,एक गाव एक गणपती सारख्या उपक्रमाला प्रोत्साहन, या सोबतच पर्यावरण पूरक मूर्ती पर्यावरण पूरक सजावट व आयोजनातून पर्यावरणाला कोणताही धोका होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शाडू मातीच्या मूर्ती, विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, हरित उत्सव अशा उपक्रमांना शासनाचे सहकार्य दिले जात आहे.

शिल्पकार, नृत्य, नाटक, संगीत, चित्रकला या क्षेत्रांतील कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजना राबवण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत भजनी मंडळांना अनुदान,राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या गणेश उत्सवांना प्रोत्साहन हे कार्य महत्त्वपूर्ण ठरत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यामध्ये जिल्हाधिकारी यांना देखील अधिकार देण्यात आले आहे. गणेश महोत्सवासाठी तालुकास्तरीय जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहे.यामुळे सर्व गणेश मंडळांशी जिल्हाधिकाऱ्यांचा अधिक व्यापक संपर्क होणार असून या महोत्सवाची सार्वजनिकता, सार्वजनिक उपयुक्तता व पर्यावरण पूरकता वाढविण्यात येत आहे. या निर्णयामुळे गणेशोत्सवाची परंपरा मर्यादित न राहता संपूर्ण राज्याच्या ओळखीचा आणि अभिमानाचा उत्सव म्हणून गौरविला गेला आहे.

**महाराष्ट्राबाहेर गणेशोत्सव**

कधीकाळी केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित असलेला हा उत्सव आज देशभर पसरला आहे. अनेक देशातही हा महोत्सव पोहचला आहे. कर्नाटक, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, दिल्ली अशा ठिकाणी मराठी समाजाच्या प्रेरणेने गणेशोत्सव सार्वजनिकरित्या साजरा होतो. विशेष म्हणजे, मुंबई वा पुण्यात राहणारा इतर राज्यातील कामगार, व्यापारी किंवा कर्मचारी हा उत्सव अनुभवतो आणि आपल्या गावी जाऊन त्याची परंपरा नेतो. अशा प्रकारे गणेशोत्सवाने राष्ट्रीय स्तरावर सामूहिकतेचे बंध निर्माण केले आहेत. लोकमान्य टिळकांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा सुरू करून समाजाला एकत्र येण्याचा धाडसी मार्ग दाखवला. त्या छोट्या सुरुवातीने आज दीडशे वर्षांचा प्रवास केला आहे. महाराष्ट्र शासनाने या परंपरेला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे, हे गणेशभक्तांसाठी अभिमानाचे पाऊल आहे. गणेशोत्सव आता केवळ धार्मिक श्रद्धेपुरता न राहता, तो कला, संस्कृती, समाजजागृती, नेतृत्व आणि आर्थिक चैतन्याचा अविभाज्य भाग बनला आहे. टिळकांचा हा वारसा आज राज्याच्या गौरवाचा उत्सव बनला आहे, त्यामुळे खऱ्या अर्थाने गणपती बाप्पा मोरया!

**प्रवीण टाके,**
**उपसंचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

## भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस, मा.नगरसेवक पनवेल महानगरपालिका, संस्थापक अध्यक्ष जाणीव एक सामाजिक संस्था तसेच अभिनव युवक मित्रमंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात शहरातील अभिनव युवक मित्रमंडळाच्या गणेशोत्सवाच्या मंडपात पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते, मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत केक कापून शुभेच्छा स्वीकारीत साजरा करण्यात आला .

यावेळी भाजप पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, कोषाध्यक्ष प्रवीण मोरबाळे, सचिव रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, मा. नगरसेविका सुहासिनी शिवणेकर, पत्रकार संजय कदम, मंडळाचे अध्यक्ष अल्पेश पाडावे, उमेश इमानदार, मयूर चिटणीस, सुधीर देसाई, राजा चव्हाण, राजू सावंत, शैलेश कदम, पूर्णेदू साळवी, तुषार कापरे, परेश बोरकर, संजय शेट्टी, प्रसाद कंधारे, संतोष लाड, दक्ष नागवेकर आदींसह नादस्फूर्ती ढोल ताशा पथक, सामाजिक संस्था पथकातील वादक, एकता मित्र मंडळ लाईन आळी, पी. के. भाई ग्रुप व मोठ्या प्रमाणात परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## लॅपटॉप सह मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या रूमच्या उघड्या दरवाज्या वाटे कोणीतरी अज्ञात इसमाने रूममध्ये प्रवेश करून तेथे असलेले लॅपटॉप, मोबाईल व पैशाचे पाकीट चोरून नेल्याची घटना शहरातील लाईन आळी येथे घडली आहे.

विवेक पुजारी रूम नंबर २०५, यश प्लाझा बिल्डिंगमधील त्यांच्या रूमच्या उघड्या दरवाज्या वाटे कोणीतरी अज्ञात इसमाने रूममध्ये प्रवेश करून तेथे असलेले लॅपटॉप, मोबाईल व पैशाचे पाकीट चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## खारघरमध्ये दोन महिलांच्या दागिन्यांची लूट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहत परिसरात दोन महिलांच्या दागिन्यांची लूट झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

खारघर, सेक्टर-३२ मधील ओवे कॅम्पमध्ये राहणाऱ्या वंदना दगडू साळुंखे (४६) या सेक्टर-३५ मधील हाईड पार्क सोसायटीच्या पाठीमागील रस्त्याने पायी चालत आपल्या कामावर जात होत्या. यावेळी त्यांच्या पाठीमागून मोटारसायकलवरुन आलेल्या दोघा लुटारूंनी वंदना साळुंखे यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची ७५ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन खेचून पलायन केले.

या घटनेनंतर वंदना साळुंखे यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तर दुसऱ्या घटनेत खारघर, सेक्टर-१२ मध्ये राहणाऱ्या मिना गायकवाड (५७) या शिलाई मशीनची मोटार दुरुस्ती करण्यासाठी नवरंग चौकात गेल्या होत्या. त्यानंतर त्या पायी चालत घरी परतत होत्या. याचवेळी त्यांच्या समोरुन मोटारसायकलवरुन आलेल्या एका लुटारुने मिना गायकवाड यांच्या गळयातील ७२ हजार रुपये किंमतीची सोन्याची बोरमाळ खेचुन पलायन केले. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


**वाचकांसाठी विनम्र सूचना**

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



**गाळा विकणे आहे**

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**


## पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष/सचिव, सुर्योदय को.ऑप. हौ.सोसा., प्लॉट क्र.०३, सी-टाईप, बिल्डींग नं.१ ते ५, सेक्टर-०८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प) | ०२ नारळ, ०१ फणस व २० गुलमोहर अशी एकूण २३ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील सुर्योदय को.ऑप. हौ.सोसा., प्लॉट क्र-०३, सी-टाईप, बिल्डींग नं.१ ते ५, सेक्टर-०८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प) या भूखंडाच्या आवारातील ०२ नारळ, ०१ फणस व २० गुलमोहर अशी एकूण २३ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधीत होत आहेत. |
| २ | अध्यक्ष/सचिव, श्री योग को.ऑप.हौ. सोसा., ६५०/५१ अ, सावरकर चौक, ता.पनवेल, जि.रायगड | ०१ नारळ झाड तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील श्री योग को. ऑप.हौ.सोसा., ६५०/५१ अ, सावरकर चौक, ता.पनवेल, जि.रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ नारळ झाड नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ३ | श्रीम.श्रुतिका मयुर जोशी, प्लॉट नं.ए ५, ३३+३४+३५, सेक्टर ६, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | ०१ फणस व ०१ जंगली अशी एकूण ०२ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.ए-५, ३३+३४+३५, सेक्टर ६, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ फणस व ०१ जंगली अशी एकूण ०२ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उपायुक्त**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. PMC-PARK/477/2025-PTAD

मा. वैशाली हंगरगेकर सो यांच्या न्यायालयात
अ‍ॅड. वैभव विजय पाटील
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.११४५/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.०५/११/२०२५

श्रीम.उज्वला विलास मेकडे वगैरे — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतसे या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती मयत विलास अनंत मेकडे यांचे दिनांक १९/०५/२०२४ या दिवशी निवासी सदनिका क्र. ४०२, चौथा मजला, ओम दत्तप्रसाद सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जुन्या पोस्ट ऑफिस जवळ, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र, पिनकोड ४१०२०६ येथे निधन झाले. मयत विलास अनंत मेकडे यांच्या नावे असलेली मिळकतीचा वारस दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी अर्ज केला आहे व त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील, सी टी एस भूखंड क्र. १२६९/ए व १२७०, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र, पिनकोड ४१०२०६.

| अ.क्र. | पत्ता | क्षेत्र चौ.फुट |
|---|---|---|
| १ | निवासी सदनिका क्र. ४०२, चौथा मजला, ओम दत्तप्रसाद सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित | ५०७.०० (चटई क्षेत्र) + ६०.०० (बाल्कनी) + १३४.०० (टेरेस) = एकूण ७०१ चौ. फुट क्षेत्र |

अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत विलास अनंत मेकडे यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मा. न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मा. न्यायालय मयत विलास अनंत मेकडे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर मयत विलास अनंत मेकडे यांच्या वारस दाखल्यास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करेल.

आज दिनांक २५/८/२५ या दिवशी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

आरटीएस अपिल क्र. १३७/२०२५

प्रति,
१. अश्विनीकुमार लिलाधर शाह
२. कल्पना अश्विनीकुमार शाह
दोघेही रा.ए-५, किर्ती मंदिर, १०६ ले.ज.रोड,
माहिम मुंबई, पीन ४०००१६ — अपिलार्थी
विरुध्द
१. फुलाबाई सोनबा मोहिते
२. राम सोनबा मोहिते स्वतः करिता
३. कमलाबाई सोनबा मोहिते
४. शाम सोनबा मोहिते
अ.क्र.१ ते ४ रा.नेरळ, ता. कर्जत, जि.रायगड
५. किरण खंडू ठाकरे
रा.वांजळे, ता.कर्जत, जि. रायगड
६. रंजना दत्तु उर्फ दत्तात्रेय लोंगले
७. सुजाता विजय लोंगले
८. सुनंदा नंदु उर्फ नंदकिशोर लॉंगले
अ.क्र.६ ते ८ रा.उमरोली, ता.कर्जत, जि. रायगड,
९. सुरेश हरिश्चंद्र टोकरे
रा.आंबिवली, ता.कर्जत, जि. रायगड
१०. दिपक चतरलाल मेहता
रा. रुम नं.५०४, पाचवा मजला,
नील पार्क को-ऑप हौ सोसायटी, पनवेल,
ता. पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — सामनेवाला

वादी यांनी मौजे : आंबिवली बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील फेरफार क्र. ९५१, ९५४, १०१४, ११९८ चे विरूध्द दि.१९/०६/२०२४ रोजी या कार्यालयात अपील दाखल केले आहे. प्रकरणी या न्यायालयाकडील दि.१९/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये वि.मा.अर्ज क्र.६६/२०२४ मान्य करुन अपिल दाखल करुन घेण्यात आलेले आहे.

सदर अपिलाचे मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि.०४/०७/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक १६/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, प्रशासकीय भवन, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

प्रस्तुत अर्जामधील सर्व सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १ | १२/१/अ | ०-४७-८० | ५.०२ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.
ठिकाण: कर्जत
दिनांक : १८/०८/२०२५

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत करिता**

# दि.बा. समर्थकांच्या योध्यांनी नवी मुंबई विमानतळाच्या कार्यालयावर दिली धडक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई एअरपोर्ट अदानी गेट वर आज दिबा समर्थक भूमिपुत्र विजय शिरढोणकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो प्रकल्पग्रस्त स्थानिक ग्रामस्थांनी प्रचंड आक्रोश व असंतोष व्यक्त करत विमानतळ प्राधिकरण विभागाचे लक्ष वेधले.

लोकनेते दिबा समर्थकांच्या योध्यांनी ऐन सणासुदीच्या काळात भर पावसात नोकर भरतीच्या प्रक्रियेतील पहिल्या टप्प्यावर आक्षेप घेत जोरदार घोषणाबाजी करत नवी मुंबई विमानतळ कार्यालया ठिकाणी मोठा जमाव केलेला होता. यावेळी स्थानिक भूमिपुत्रांमध्ये गठ तट निर्माण करत राजकारण करणाऱ्या सत्तेतील भाजपच्या पदाधिकाऱ्याची माहिती देण्यात आली तसेच संघर्ष समिती म्हणून गाव प्रकल्पग्रस्त पातळीवरील संघटनेच्या कृती वर अविश्वास हि व्यक्त करण्यात आला. आमचा उद्देश भूमिपुत्रांना न्याय देणे आहे ,आम्हाला आमचं स्वार्थ नाही असे म्हणत प्रलंबित व विलंब होत असलेल्या नोकर भरती, नामकरण मुद्द्यावर सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत भाजप पक्षाचा राजीनामा देणारे दि बा कट्टर समर्थक विजय शिरढोंणकर व अनेक अजी ,माजी लोकप्रतिनिधी, स्थानिक भूमिपुत्रांनी यावेळी नोकर भरती प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप होत असून अश्या मुद्द्यावर छुपा राजकारण होत आहे असे सांगितले.

या विमानतळ प्रकल्पात आमदारांची एक इंच देखील जमीन गेलेली नाही. भूमिपुत्रांना डावलण्याचा प्रकार कोणी करत असतील तर दिबांच्या आंदोलनाची पुनरावृत्ती केली जाईल असे हि सांगण्यात आले .अदानी समूहाने नेमलेल्या कंपन्यांनी नोकरी देताना ८०% अधिकृत प्रकल्पग्रस्तच भरावे त्यांनी तसे नाही केल्यास त्यांना तात्काळ बदलण्यात यावे असे हि ठमकावून सांगण्यात आले.

सरकारला आमच्या भूमिपुत्रांच्या लोकभावना समजाव्यात म्हणून आम्ही आज पर्यंत विविध पध्दतीने दि बा समर्थक लोकशाही च्या मार्गाने सरकार पर्यंत निवेदन, मागणी करत आहोत, आज परत एकदा गणेश उत्सवाच्या निमित्ताने आम्ही अंतिम सूचना वजा इशारा देत गणेश मूर्ती आणि पुष्प देऊन प्रार्थना करून आपल्या सहकार्याची अपेक्षा करत आहोत, हा प्रकल्प अजून अपूर्ण असून अनेक सोयी सुविधांपासून वंचित आहे. या सर्व प्रकल्पासाठी अतोनात त्रास प्रकल्पग्रस्तांनी अनेक वर्षे सहन केलेला आहे.

नोकरीसाठी संधी प्रथमता विस्थापित दहा गावांतील तरुणांना द्यावी त्यानंतर २७ गाव, नैना व ९५ गावांतील इतर उमेदवारांचा विचार करावा असे अदानी समूहाच्या अधिकारी नवी मुंबई विमानतळ मानव संसाधन विभाग प्रमुख पूनम डावरे यांना उपस्थित शिष्टमंडळाने विनंतीपूर्वक सांगितले. मुंबई विमानतळाच्या ठिकाणचे अनुभवी कामगार आपण येथे आणत असाल आणि प्रकल्पग्रस्तांना नाम मात्र घेत असाल तर संघर्ष निर्माण होण्यासाठी आपणच कारणीभूत असाल असे हि सांगण्यात आले. आमच्या मागण्या हक्क अधिकाराच्या आहेत त्या मान्य केल्या गेल्या नाहीत, तर आजपासून आम्ही या लढ्यात अधिक तीव्रतेने उतरणार आणि लढा रक्तरंजित बलिदानातून भूमिपुत्रांना न्याय दिल्याशिवाय राहणार नाही असे विजय शिरढोणकर यांनी सांगत सर्व उपस्थित अधिकारी , प्रकल्पग्रस्तांचे व मान्यवरांचे आभार मानले.

# राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांचा संप १० व्या दिवशीही सुरु

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांचा संप १० व्या दिवशीही सुरु आहे. शासनासोबत दोन वेळा बैठक झाली परंतु त्यावर तोडगा निघाला नाही. त्यामुळे झाला आहे. अद्यापही नवजात शिशु विभाग आणि डायलेसिस विभाग सुरु ठेवला असल्याची माहिती राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती चे रायगड चे अध्यक्ष विकास धुमाळ ह्यांनी दिली.

सरकारी सेवेतील समावेशासह विविध मांगण्यासाठी रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील ६०० हुन अधिक अधिकारी व कर्मचारी ह्यांनी १९ तारखेपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. यामुळे सरकारी रुग्णालयातील अत्यावश्यक सेवेसह अतिदक्षता विभाग, लसीकरण औषध वितरण यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्या डायलेसिस आणि नवजात कक्ष हे दोन विभागातील अधिकारी कर्मचारी कार्यरत आहेत परंतु दोन दिवसात शासनाकडून निर्णय न झाल्यास त्या विभागातील कर्मचारी बेमुदत आंदोलनातं सहभागी होणार आहेत अशी माहिती राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती चे रायगड चे अध्यक्ष विकास धुमाळ ह्यांनी दिली.

राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती अंतर्गत विविध आरोग्य कामगार संघटना प्रथमच यामध्ये सक्रिय झाल्या आहेत. यामध्ये अधिकारी आणि कर्मचारी यांचा सहभाग असल्याने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होणार आहे. हे सर्व सरकारी रुग्णालयात आरोग्य विभागाच्या नियमित सेवेत असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्याबरोबर खांद्याला खांदा लावून काम करतात. परंतु त्यांना पगार कमी मिळतो १० वर्षापेक्षा अधिककाळ सेवेत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ७० संवर्ग आहेत. शासनाच्या २०२४ मध्ये सहसा निर्णय जारी करून त्यांना सरकारी सेवेत संयोजन करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यापैकी केवळ चतुर्थ श्रेणीतील आणि चालक ह्यांचेच समायोजन झाले उर्वरितांच्या तोंडाला पाने पुसली.

२०२२ मध्ये समायोजनाचा आदेश उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दिले होते त्यावर ३० टक्के मंजूर पदावर समायोजनाचा निर्णय घेण्यात आला पण दीड वर्ष झाले तरी हा निर्णय आमलात आणला नाही त्यासह १५ टक्के मानधन वाढ तात्काळ लागू करणे, बदली धोरण भविष्य निर्वाह निधी व विमा योजना सेवेत असताना मृत्यू झाल्यास ५० लाख, व अपंगांत्व आल्यास २५ लाख सानुग्रह अनुदान आदी १८ मागण्या मान्य कराव्यात अशी आंदोलकांची मागणी केली आहे.



# ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून भागवत सोनवणे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी), ठाणे येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून भागवत सोनवणे यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. त्यांनी संजय गोविलकर यांच्याकडून या पदाची सूत्रे हाती घेतली आहेत. संजय गोविलकर यांच्या कार्यकाळातही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अतिशय धाडसी कारवाया केल्या.

यापूर्वी श्री.सोनवणे हे महाराष्ट्र पोलीस दलात विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत होते. त्यांच्याकडे गुन्हेगारी आणि भ्रष्टाचारविरोधी प्रकरणांचा तपास करण्याचा मोठा अनुभव आहे. त्यांनी नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात पोलीस उप अधीक्षक पदावर धडाडीने काम केले आहे, ज्यामुळे त्यांना भ्रष्टाचारविरोधी मोहिमांची सखोल माहिती आहे. तसेच सहायक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, नागपूर शहर, मुंबई शहर, नाशिक शहर तसेच महाराष्ट्रातील ग्रामीण भागातही उत्कृष्ट सेवा बजावली आहे.



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून श्री.सोनवणे यांच्या नियुक्तीमुळे प्रशासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येईल आणि लाचखोरीला रोखण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमांना बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पनवेल महापालिकेतर्फे लोकशाही दिनाचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी दिनांक १ सप्टेंबर रोजी मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात लोकशाही दिन घेण्यात येणार आहे.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे.

नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

# सुरव तर्फे निजामपूर ग्रामस्थांचा भाजपामध्ये जाहीर पक्षप्रवेश

**दै.रायगड नगरी । माणगाव**

शासकीय विश्रामगृह माणगाव येथे माणगाव तालुक्यातील तळाशेत जिल्हा परिषद गणातील सुरव तर्फे निजामपूर येथील ग्रामस्थांनी युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे,जेष्ठ नेते संजय आप्पा ढवळे,तालुकाध्यक्ष परेश सांगले यांच्या उपस्थितीत भाजप पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.यावेळी प्राजक्ता शुक्ला मॅडम,तालुका सरचिटणीस बाबुरावजी चव्हाण,तालुका उपाध्यक्ष सुधीरजी म्हामुणकर,महादेवजी कदम,समीरजी बक्कम,युवा सरचिटणीस अमोल पवार,युवा सरचिटणीस श्रीराम कळंबे,नीलमजी काळे,किसान मोर्चा नयनजी पोटले,अनिलजी दांडेकर,समीरजी पवार,अनिकेत करकरे,अनिल सत्वे हे उपस्थित होते.

यावेळी बाबाजी लहाने, सदाशिव लहाने, धोंडू लहाने, दिपक लहाने, नथुराम लहाने, विजय लहाने, प्रितेश लहाने, महेंद्र लहाने, मंगेश खाडे, प्रशांत लहाने, विकास भोनकर, प्रतिक लहाने, नयन लहाने, पंकज लहाने, राजश्री लहाने, अनिता लहाने, मंजुला लहाने चंदा लहाने, नम्रता लहाने, लतिका खाडे, ऋतुजा लहाने, प्रणाली लहाने, भक्ती लहाने, आकांक्षा लहाने आदी सुरव तर्फे निजामपूर ग्रामस्थांनी भाजप पक्षात पक्ष प्रवेश केला.

यावेळी निलेश थोरे पुढे म्हणाले की, भाजप हा केवळ राजकीय पक्ष नसून एक कुटुंब आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत तळाशेत जिल्हा परिषद व साई पंचायत समिती गणात भाजप पक्ष पूर्ण ताकदीने निवडणूक लढवेल. सुरव तर्फे निजामपूर गावातील विकास कामांसाठी लवकरच निधी उपलब्ध केला जाईल, असा विश्वास यावेळी थोरे यांनी व्यक्त केला. तसेच तालुका अध्यक्ष परेश सांगळे म्हणाले की, सुरव तर्फे निजामपूर ग्रामस्थांच्या अडचणीच्या काळात भाजप पक्ष खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभा राहील. त्यांना सर्वोत्परी ताकद भाजप पक्षातर्फे दिली जाईल. सर्व प्रवेशकर्त्या ग्रामस्थांचे सांगळे यांनी भाजप पक्षात स्वागत केले.



# लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नागरिकांना मोफत गणपतीचा शिधा वितरित




**दै.रायगड नगरी । पनवेल**

दानशूर व्यक्तिमत्व, रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक चेअरमन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गव्हाण जिल्हा परिषद गट आणि उलवे नोड भारतीय जनता पार्टीच्या वतीने गणेशोत्सव तसेच गौरी-गणपतीच्या पार्श्वभूमीवर परिसरातील हजारो नागरिकांना मोफत गणपतीचा शिधा वितरित करण्याचा कार्यक्रम गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा तिथीनुसार अमृतमहोत्सवी वाढदिवस असल्याने मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल आणि गुलाबाचा महापुष्पहार घालून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त पनवेल-उरण परिसरात वर्षभर विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. गुरुवारी त्यांचा तिथीनुसार अमृत महोत्सवी वाढदिवस असल्यामुळे त्यांच्या संकल्पनेतून परिसरातील हजारो रहिवाशांना आणि गोरगरिबांना मोफत गणपतीचा शिधा वाटप करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, आपल्या जीवनात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील, जनार्दन आत्माराम भगत आणि माता-पित्यांच्या संस्कार व आशीर्वादांमुळेच आपण घडलो आहोत असे सांगून सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या आणि भावी जीवन आनंदमयी व सुखी-समृद्ध होवो अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार महेश बालदी, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्राध्यापक डॉ. सदाशिवराव कदम आणि साई संस्थान वहाळचे अध्यक्ष रवीशेठ पाटील यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्राध्यापक डॉक्टर सदाशिवराव कदम, जे.के. जाधव, भाजपचे ज्येष्ठ जे.एम.म्हात्रे, भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, दिवंगत दि.बा.पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, रवीशेठ पाटील, भाऊशेठ पाटील यांच्यासह सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# कोलाड रेल्वे फाटका जवळ जीवघेणे खड्डे

**दै.रायगड नगरी । कोलाड**

कोलाड भिरा फाटा येथील कोलाड रेल्वे फाटका जवळ भले मोठे खड्डे पडल्यामुळे या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवासी नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असुन कोणाचा नाहक बळी गेल्यानंतर उपाययोजना केली जाईल काय? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त केली जात आहे.



वरसगांव-भिरा मार्गावर विले भागाड परिसरात मोठी एम आय डी सी, मोठ मोठे कारखाने आहेत त्यांची जड अवजड वाहतूक याच मार्गाने सदैव राजरोसपने सुरू असते दिवसा गणित दररोज अपघातांची मालिका सुरूच आहे. मोठ मोठे स्टील कॉइल वाहतूक करणारे ट्रेलर पलटी होतात यावर कोणाचेच नियंत्रण नाही.तसेच याच मार्गांवरून कोकण रेल्वेची रो रो सेवा सुरु असुन या मार्गांवरून असंख्य अवजड माल वाहतूक वाहने येजा करीत असुन या अवजड वाहनांमुळे या मार्गांवर मोठं मोठे खड्डे पडले असून नागरिकांना या खड्ड्यांतून प्रवास करून मार्ग काढावा लागतो हे दुर्दैव म्हणावे लागेल.

तसेच वरसगांव ते भिरा फाट्यावरून ताम्हाणी मार्गी पुण्याकडे जाणारा नजदिकचा मार्ग असुन या मार्गांवर वाहतुकीचे प्रमाण वाढले आहे. तसेच या मार्गांवर असंख्य गावे व वास्त्यांचा समावेश येत असुन या परिसरातील असंख्य नागरिक कोलाड बाजारपेठेत येजा करीत असतात परंतु या मार्गावर पडलेले खड्डयांमुळे अपघात होऊन कोणाचा नाहक बळी जाऊ शकतो यामुळे मोठा अपघात होण्याच्या अगोदर उपाय योजना करावी अशी मागणी प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

# शासनाच्या बदलत्या क्रीडा धोरणांचा खेळाडूंनी लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । रायगड**

ग्रामीण आणि शहरी भागात क्रीडा संस्कृतीचा प्रसार व्हावा यासाठी हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. हा दिवस रायगड जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे मॅरेथॉन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. .कार्यक्रमास खासदार धैर्यशील पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे तसेच राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी श्रीमती तपस्वी गोंधळी उपस्थित होते.

खासदार धैर्यशील पाटील यांनी खेळ केवळ मनोरंजन किंवा फिटनेससाठी मर्यादित न ठेवता करिअर म्हणून गंभीरतेने घ्यावा, असे आवाहन खेळाडूंना केले. ग्रामीण भागात क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्यास उत्कृष्ट खेळाडू तयार होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच क्रीडाविकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी खेळामुळे शारीरिक व बौद्धिक क्षमतांचा विकास होतो, असे सांगून शासनाच्या बदलत्या क्रीडा धोरणांचा खेळाडूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. प्रस्ताविकेत जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी मेजर ध्यानचंद यांच्या कारकीर्दीचा आढावा घेत सांगितले की, त्यांनी सैन्यातून हॉकी खेळाला सुरुवात केली आणि कारकिर्दीत तब्बल १ हजाराहून अधिक गोलांची नोंद केली. त्यांच्या स्मरणार्थ सर्वोच्च 'ध्यानचंद क्रीडा पुरस्कार' जाहीर करण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले.

या निमित्ताने आयोजित ३ किमी मॅरेथॉन स्पर्धेत शंभरहून अधिक खेळाडूंनी विविध वयोगटातून सहभाग नोंदवला. तसेच जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी देखील उत्स्फूर्त सहभाग घेतला.

